॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

* सुविचार *
पैशाने माणसाला महत्व प्राप्त होते.

▪ अहिल्यानगर ▪ शनिवार, दि. ९ मे २०२६ ▪ वर्ष ६ वे ▪ अंक ३५२ वा ▪ पाने ४ ▪ किंमत ३ रुपये ▪ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

# कांदा उत्पादक शेतकरी संकटात

## बळीराजा चिंतेत । अस्मानी संकटानंतर कांदा कवडीमोल भावाने विकायची वेळ

● **नाशिक । वीरभूमी –** राज्यभरात सध्या पडत असलेल्या अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना चांगलाच फटका बसला आहे. आधीच आर्थिक संकटात सापडलेला बळिराजा आता अधिक चिंतेत सापडला आहे. आखाती युद्धामुळे कांदा निर्यात मंदावली आहे. त्यामुळे कांद्याला भाव मिळणे तर दूरच मात्र लागलेला खर्चही मिळणे अवघड झाले आहे.

दुसरीकडे अस्मानी संकटाने बळिराजाचे पुरते कंबरडे मोडले आहे. अशातच बळिराजाच्या नशिबी आलेली दैना पुन्हा एकदा कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये पाहायला मिळाली आहे. बाजारभावात झालेल्या प्रचंड घसरणीचा मोठा फटका उत्पादकांना बसला आहे. ७३ गोणी कांदा विकल्यानंतर सर्व खर्च वजा जाता या शेतक-याच्या हातात केवळ ४०० रुपये मिळाले आहेत. म्हणजेच कांद्याला प्रतिकिलो ५० पैसे हा कवडीमोल भाव मिळाला आहे.

दुसरीकडे, पश्चिम विदर्भातील तापमान हे ४५ अंशापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. वाढत्या तापमानामुळे कांद्याचा दर्जा खालावत असल्याने व कांद्याला भाव मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झालेले आहेत. सध्या पश्चिम विदर्भात कांद्याला साडेचारशे ते साडेपाचशे रुपये प्रति क्विंटल भाव मिळत असल्याने उत्पादन खर्चाच्या तुलनेत तो भाव कमी असल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.



शिवाय सातत्याने होत असलेला अवकाळी पाऊस, वादळ, यामुळे कांदा भिजल्याने सडत असल्याचे चित्र आहे. परिणामी, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीचा सामना करत आहे. दरवर्षी कांदा लागवड करूनही भाव मिळत नसल्याने दिवसेंदिवस पश्चिम विदर्भातील कांदा उत्पादन क्षेत्र घटत असल्याचीही माहिती आहे.

सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये करमाळा तालुक्यातील पांगरे येथील शेतकरी अंकुश अण्णा गुंजाळ यांना बाजारभावात झालेल्या प्रचंड घसरणीचा मोठा फटका बसला आहे. ७३ गोणी कांदा विकल्यानंतर सर्व खर्च वजा जाता या शेतक-याच्या हातात केवळ ४०० रुपये मिळाले आहेत.

### कांद्याला मिळाला फक्त प्रतिकिलो ५० पैसे भाव

▪ मिळालेल्या पट्टीनुसार, कांद्याच्या विक्रीतून मिळालेली एकूण रक्कम आणि त्यावर झालेला खर्च यांचा ताळमेळ बसवणे कठीण झाले आहे. ७३ पिशव्या कांदा विकल्यानंतर अंकुश गुंजाळ शेतकऱ्याला एकूण ५०६८ रुपये मिळाले होते. वाहतुकीचे गाडी भाडे, हमाली, तोलाई आणि इतर आडत खर्च वजा जाता, प्रत्यक्षात शेतकऱ्याला केवळ ४०० रुपये म्हणजे ५० पैसे किलो भावाने पैसे मिळाले आहेत.

अंकुश गुंजाळ यांनी आपल्या शेतात कष्टाने पिकवलेला कांदा २१ एप्रिल २०२६ रोजी सोलापूरच्या 'शरीफ ट्रेडर्स' या आडत दुकानावर विक्रीसाठी आणला होता. एकूण ७३ पिशव्या (पोती) कांदा त्यांनी विक्रीसाठी लावला होता. मात्र, बाजारपेठेत कांद्याची आवक वाढल्याने आणि मागणी घटल्याने त्यांच्या कांद्याला प्रति किलो केवळ ५० पैसे इतका नीचांकी भाव मिळाला.

## SPOT NEWS

### सुवेंदू अधिकारी होणार पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री

● **मुंबई –** सुवेंदू अधिकारी हे पश्चिम बंगालचे नवीन मुख्यमंत्री असतील. कोलकाता येथील कन्व्हेन्शन सेंटरमध्ये पार पडलेल्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांची नेतेपदी निवड करण्यात आली. या बैठकीनंतर अमित शहा यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली.सभेला संबोधित करताना शाह म्हणाले की, १९५० मध्ये ज्या विचारसरणीसह आम्ही आपला प्रवास सुरू केला होता. ती म्हणजे श्यामा प्रसाद मुखर्जी यांची विचारसरणी त्याच विचारसरणीचा परिपाक आज खुद्द त्यांच्याच पक्षाच्या हाती सरकार स्थापन होण्यात झाला आहे. ममताजींच्या राजवटीत गुन्हेगारच राजकारणी बनले आहेत, ज्यामुळे विकासाला यत्किंचितही वाव उरलेला नाही. अवघ्या काही महिन्यांतच या सर्व गोष्टींचा अंत होईल. मुख्यमंत्री उद्या सकाळी १० वाजता कोलकाता येथील ब्रिगेड परेड ग्राउंडवर पदाची शपथ घेतील. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्यासह एनडीएचे अनेक प्रमुख नेते या शपथविधी समारंभास उपस्थित राहतील. सुवेंदू यांनी भवानीपूर मतदारसंघात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला. तसेच, त्यांनी नंदीग्राम मतदारसंघातूनही सलग दुस-यांदा निवडणूक जिंकली; याच मतदारसंघातून त्यांनी २०२१ मध्ये ममता यांचा पराभव केला होता. विधानसभा निवडणुकीत भाजपने २०७ जागांवर विजय मिळवला आहे.

### तिकीट दरात २५ ते ३० टक्क्यांनी वाढ पर्यटकांचे बजेट कोलमडले

● **मुंबई –** उन्हाळी सुटी सुरू होताच देशभरातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा थेट परिणाम विमान प्रवासाच्या तिकीट दरांवर झाला असून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान भाड्यात तब्बल २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाढती प्रवासी मागणी, इंधन दरवाढ आणि पर्यटन हंगाम यामुळे विमान कंपन्यांनी तिकीटदर वाढवल्याने प्रवाशांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. विशेषत: गोवा, हिमाचल प्रदेश, काश्मीर, लेह-लडाख, उत्तराखंड आणि दक्षिण भारतातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फटका बसत आहे. उन्हाळ्याच्या वाढत्या उकाड्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटक थंड हवेच्या ठिकाणी फिरण्यासाठी मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. त्यामुळे विमानप्रवासाची मागणी वाढली आहे.

## पुणे विभागाचा निकाल ९४.२४ टक्के

### पुणे जिल्हा अव्वल, सोलापूर-अहिल्यानगरमध्येही मुलींचीच सरशी!

● **पुणे । वीरभूमी –** इयत्ता दहावीच्या परीक्षेत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत पुणे विभागीय मंडळात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ९४.२४ टक्के आहे. गेल्या वर्षी हे प्रमाण ९४.८१ टक्के होते. त्यामुळे निकालात किंचित घट झाली आहे. पुणे विभागीय मंडळात पुणे जिल्ह्याने अव्वल स्थान पटकावले असले, तरी अहिल्यानगरमधून ९२.६९ टक्के, तर सोलापूर जिल्ह्यातून ९१.३१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

दहावीच्या परीक्षेसाठी पुणे विभागातून यंदा दोन लाख ६६ हजार ६५६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी दोन लाख ६४ हजार ९९२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी दोन लाख ४९ हजार ७५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विभागीय अध्यक्ष औदुंबर उकिरडे आणि सचिव डॉ. मीनाक्षी राऊत यांनी ही माहिती दिली.

जिल्हानिहाय तुलनेत पुणे जिल्ह्याने ९६.४६ टक्के उत्तीर्णांचे प्रमाण मिळवून विभागात पहिला क्रमांक पटकावला आहे. त्यानंतर अहिल्यानगर आणि सोलापूर या जिल्ह्यांचा क्रम लागतो. तिन्ही जिल्ह्यांत एकूण निकाल समाधानकारक राहिल्याचे चित्र दिसून आले आहे. दरम्यान, राज्याच्या निकालाच्या धर्तीवर पुणे विभागातही मुलींचे उत्तीर्णांचे प्रमाण मुलापेक्षा अधिक आहे. तिन्ही जिल्ह्यांत मुलींनी आघाडी कायम राहिल्याने यंदाही मुलीच सरस ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

१५.३३ दहावीच्या परीक्षेत पुणे विभागातील तिन्ही जिल्ह्यांत मुलींचे उत्तीर्णांचे प्रमाण मुलापेक्षा अधिक नोंदवले गेले आहे. पुण्यात मुलांचे उत्तीर्णांचे प्रमाण ९५.३३ टक्के असताना मुलींचे प्रमाण ९७.७० टक्के आहे. अहिल्यानगरमध्ये मुलांचे प्रमाण ९०.४० टक्के, तर मुलीचे प्रमाण ९५.५३ टक्के, तर सोलापूरमध्ये मुलांचे प्रमाण ८७.९१ टक्के आणि मुलींचे प्रमाण ९५.३२ टक्के नोंदवले गेले आहे. तिन्ही जिल्ह्यांत मुलींची सरशी कायम राहिल्याने यंदाही मुलीच आघाडीवर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## नगर शहरात पोलिसांनी १८ जुगारी पकडले

● **अहिल्यानगर । वीरभूमी –** शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पुलाजवळ चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर भिंगार कॅम्प पोलिसांनी गुरुवारी (दि. ७) मध्यरात्रीच्या सुमारास छापा घातला. या छाप्यात हार-जितीचा जुगार खेळणाऱ्या तब्बल १८ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख रक्कम लॅपटॉप, मोबाईल व जुगाराचे असा ४ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिस अंमलदार रविंद्र टाकळे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना माहिती मिळाली की, शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात पत्र्याच्या शेडमध्ये जुगार अड्डा सुरू आहे. त्यांनी तत्काळ भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना जुगार अड्ड्यावर छापा घालण्याचा आदेश दिला. त्यानुसार ७ मे रोजी रात्री स्टेशन रोड लगत असलेल्या लोखंडी पुलाच्या बाजूला मोकळ्या जागेत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा घातला.


त्यावेळी काही लोक जुगार खेळताना दिसून आले. पोलिसांनी समीर सुनिल साळवे (वय २०), अथर्व सुभाष कांबळे (वय १८, रा. सौरभ नगर, भिंगार), प्रशांत चंद्रकांत पवार (वय २५, रा. मल्हार चौक, स्टेशन रोड), दीपक बाळू वाघमारे (वय ४०, रा. रामवाडी, सर्जेपुरा), सचिन प्रभाकर परदेशी (वय ४५, रा. सावेडी), सुरेश श्रीनिवास नन्नवरे (वय ४३, रा. कायनेटिक चौक), मोझेस विन्सेंट सायमन (वय ३१, रा. गवळीवाडा, भिंगार), मनोहर विश्वनाथ कोडम (वय ५२, रा. तोफखाना, अहिल्यानगर), फुरकान शकील शेख (वय २५, रा. आशा टॉकीज जवळ), जावेद आयुब शेख (वय २६, रा. आशा टॉकीज जवळ, अहिल्यानगर) किसन विठोबा पवार (वय ४२, रा. निंबळक, ता. अहिल्यानगर), संतोष रामभाऊ राशीनकर (वय ४१, रा. वडाळा महादेव, ता. श्रीरामपूर), युवराज भाऊसाहेब करंजुले (वय ४६, रा. मुकुंदनगर, नगर), रोहित विजय उमाप (वय २५, रा. माळीवाडा, अहिल्यानगर), प्रकाश रमनलाल शहा (वय ६७, रा. आनंदबाजार, अहिल्यानगर), युवराज बाळू वाघमारे (वय २५, रा. माळीवाडा) शहारुख इक्बाल पठाण (वय ३०, रा. कोठला, अहिल्यानगर), अल्फाज अल्लाउद्दीन तांबोळी आदींसह ३० जणांचा समावेश आहे. कायदेशीर प्रक्रिया पार पाडून त्यांना सोडून देण्यात आले.

# एल निनोचे संकट शतकातील सर्वांत तीव्र असणार?

● **नवी दिल्ली । वीरभूमी –** एल निनोची एक संभाव्यत: तीव्र घटना जागतिक चिंतेचे कारण बनली आहे. कारण येऊ घातलेला अल निनो हा शतकातला सर्वात तीव्र असू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. शिवाय त्याचा परिणाम जगभरात भयानक परिस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरणार असल्याचीही शक्यता आहे. ईसीएमडब्ल्यूएफ या युरोपियन वेधशाळेने याबाबत भीती व्यक्त केली आहे. त्यामुळे अल निनोबाबत चिंता वाढली आहे.

सुरवातीच्या अंदाजानुसार ही घटना १८७७-७८ मधील त्या विनाशकारी पर्वाशी बरोबरी करू शकते. किंबहुना त्याहूनही अधिक तीव्र ठरू शकते, जे मानवी इतिहासातील सर्वात प्राणघातक हवामान घटनांपैकी एक मानली जात आहे. त्या ऐतिहासिक एल निनो घटनेमुळे जगाच्या मोठ्या भागामध्ये तीव्र उष्णतेच्या लाटा, दीर्घकालीन दुष्काळ, पिकांचे नुकसान आणि भीषण अन्नटंचाई (दुष्काळ) निर्माण झाली होती. यामुळे लाखो लोकांचा बळी गेला, ज्यांची संख्या त्या काळातील एकूण जागतिक लोकसंख्येच्या सुमारे ४ टक्के इतकी असल्याचा अंदाज आहे.

ईसीएमडब्ल्यूएफ या युरोपियन देशातील वेधशाळेने हा अंदाज व्यक्त करत भीती व्यक्त केली आहे. जगातील अनेक देशांसह भारतावरही हे संकट घोंगावत आहे. जगभरातील हवामान तज्ज्ञांनी यंदाच्या वर्षाच्या उत्तरार्धात 'सुपर एल निनो' येण्याची शक्यता व्यक्त केली आहे. हा एल निनो अत्यंत




तीव्र असू शकतो आणि त्याचा परिणाम जगातील अनेक देशांसह भारतावरही होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे याबाबत भारताने चिंता करावी का, असा प्रश्नही निर्माण झाला आहे. भारतासाठी धोके विशेषत: मोठे आहेत.

भारताची कृषी, जलस्रोत आणि एकूण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर मान्सूनवर अवलंबून आहे आणि एल निनोच्या घटनांमुळे मान्सून कमकुवत होतो, हे सर्वश्रुत आहे. दरम्यान, २०२६ मध्ये एखादी तीव्र घटना घडल्यास मान्सूनच्या हंगामात सामान्यपेक्षा कमी पावसासोबतच उत्तर, मध्य आणि पूर्व भारतात तीव्र आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या उष्णतेच्या लाटा येऊ शकतात. या एकत्रित परिणामांमुळे पाणीपुरवठ्यावर ताण येऊ शकतो, पिकांचे उत्पन्न घटू शकते आणि अन्नधान्याच्या किमती वाढू शकतात. तीव्र उष्णता आणि आर्द्रतेमुळे शहरी भागांना आरोग्याच्या वाढत्या धोक्यांचाही सामना करावा लागू शकतो.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार एल निनो ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात सर्वाधिक परिणाम पाहायला मिळू शकतो. त्याचाच एक भाग म्हणजे यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता आहे. दरम्यान, मे महिन्यात उन्हाची तीव्रता कमी असेल. पण उष्णतेच्या लाटा अधिक असतील. पॉझिटिव्ह आयओडी विकसित झाल्यास परिणामांची तीव्रता कमी असेल, असाही अंदाज वर्तवला आहे.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने उपाययोजनांना गती देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणून जलयुक्त शिवार आणि गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार यांची कामे तातडीने आणि मोठ्या प्रमाणात पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. त्यासाठी वित्त विभागाने तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, दुरुस्ती आणि पुनरुज्जीवन ही कामे प्राधान्याने करा, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

SPOT NEWS

## श्री स्वामी समर्थ विद्यालयाचा दहावीचा ९६ टक्के निकाल

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

श्री स्वामी समर्थ सेवा संस्थेच्या श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांचा दरवर्षीप्रमाणे उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत ९६ टक्के निकाल लागला. दुर्गम आदिवासी भागातील, पाड्या– वस्त्यांवरील श्रमिकांची, कष्टकऱ्यांची शाळा अशी विद्यालयाची ख्याती आहे.तरीही गुणवत्तेच्या बाबतीत नेहमी अग्रणी असलेल्या विद्यालयाचा निकाल याही वर्षी गुणवत्तापूर्ण लागलेला आहे. डोंगराच्या पोटाशी राहून वाघाशी झुंज केलेल्या शेतकरी कुटुंबातील श्रद्धा प्रकाश मुतडक हिने दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. मागील वर्षीही भाजीपाला विक्रेत्या दांपत्याच्या मुलीचा प्रथम क्रमांक आला होता. विद्यालय विविध उपक्रम, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्याख्यान, भविष्याचा वेध घेणारे व जागरूक करणारे कार्यक्रम यासाठी प्रयत्नशील असते, त्यामुळेच विद्यालयाचा निकाल ९६ टक्के लागलेला आहे. यामध्ये प्रथम क्रमांक श्रद्धा प्रकाश मुतडक (८३ %), द्वितीय क्रमांक सिद्धार्थ मच्छिंद्र देशमुख (७०.७० %), तृतीय क्रमांक सोनाक्षी राहुल पवार(६४.४० %), चतुर्थ क्रमांक जुळे भाऊ असणारे साई व समर्थ ज्ञानेश्वर मुतडक (६४.२०%) व पाचवा क्रमांक ललित अण्णा शिंदे (६३.८० %) यांनी मिळवला. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे आमच्या विद्यार्थ्यांचा निकाल चांगला लागलेला असून विद्यार्थ्यांना जगाबरोबर चालता येईल असे व्यक्तिमत्वही विद्यालयाने घडवले आहे, याचे आम्हास समाधान आहे अशा प्रतिक्रिया पालकांनी दिल्या. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत बांगर, सचिव शांताराम काळे, प्रकाश टाकळकर, मंजुषा काळे, स्वप्नील काळे, संतोष बनसोडे, यांनी चांगल्या निकालाबद्दल प्राचार्य किरण भागवत, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले आहे. निकाल लागताच यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे सत्कार संस्था व विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक वर्गाकडून व ग्रामस्थांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अगस्ती विद्यालयची यशाची परंपरा कायम

**● अकोले । वीरभूमी–**

नुकत्याच झालेल्या फेब्रुवारी/ मार्च २०२६ शालांत परीक्षेमध्ये अगस्ति माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. तालुक्यात दुसरा, तिसरा, चौथा अगस्ती विद्यालयाचेच विद्यार्थी आले आहेत. प्रथम क्रमांक बगणर दिव्या संतोष ९८.६०% हिने मिळवला. द्वितीय क्रमांक ठोकळ यशराज गणेश –९८ ४५% याने तर पंडित श्रद्धा महेश ९७.४०% गुण मिळवून तृतीय आली. विद्यालयात ९०% च्या पुढे १३ विद्यार्थी ८५% च्या पुढे २७ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवलेले ८६ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये ८८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले . विद्यालयाचा निकाल ९८.२९% लागला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री अगस्ति एज्युकेशन सोसायटीच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, संस्थेचे कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, कार्याध्यक्ष सतीश नाईकवाडी, कार्याध्यक्ष संदीप नाईकवाडी, मुख्याध्यापक मंगेश खांबेकर, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब दौंड, पर्यवेक्षिका नंदा गोपाळे यांनी अभिनंदन केले आहे.

## सावेडी बस स्थानकामुळे प्रवाशांना
# अधिक सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । सावेडी येथे बस स्थानकाचे भूमिपुजन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सावेडी परिसरासाठी स्वतंत्र बस स्थानकाची अनेक वर्षांची मागणी होती. या बस स्थानकामुळे प्रवाशांना मोठी सुविधा उपलब्ध होणार असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि प्रवासीकेंद्रित होणार असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

मनमाड रोड परिसरात सुमारे ५ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या सावेडी बस स्थानकाच्या भूमिपूजन समारंभात पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते.



कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उप महापौर ॲड. धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, राज्य परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, शहराचा वाढता विस्तार आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता सावेडी परिसरात आधुनिक बस स्थानक उभारणे आवश्यक झाले होते. या बस स्थानकामुळे प्रवाशांना सुरक्षित आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध होतील. प्रवाशांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने अत्याधुनिक वातानुकूलित बसेस तसेच पर्यावरणपूरक ई–बसेस सुरू केल्या असून प्रवास अधिक आरामदायी आणि सुरक्षित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रवासात मोठ्या प्रमाणात सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे अधिकाधिक नागरिक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करत असून महामंडळ अधिक लोकाभिमुख होत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. बस स्थानकाचे काम गुणवत्तापूर्ण आणि वेगाने पूर्ण करण्याच्या सूचना देत त्यांनी प्रवाशांसाठी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, प्रतीक्षागृह तसेच इतर सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था लोकसहभागातून उभारण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

कार्यक्रमास पदाधिकारी, महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गौतम पब्लिक स्कूलची शंभर टक्के निकालाची २० वर्षांची परंपरा कायम

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलने यंदाच्या एसएससी बोर्ड परीक्षेत पुन्हा एकदा शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने सलग २० व्या वर्षी १०० % निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम राखली असल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अक्षय प्रकाश आवारे याने ९३.४० % गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. साहिल रतन जाधव याने ९०.६० % गुणांसह द्वितीय, तर वेदांत महेंद्र जाधव याने ९० % गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला. तसेच मानस गोरख पाटील ८८.४० % आणि कार्तिक साहेबराव दाते ८७.६० % यांनी देखील विशेष प्राविण्य मिळवत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

गेल्या दोन दशकांपासून गौतम पब्लिक स्कूलने सातत्याने शैक्षणिक दर्जा राखला आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शिक्षण, नैतिक मूल्ये, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, तसेच सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांवर विशेष भर दिला जात आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन माजी आ. अशोकराव काळे, विश्वस्त, आ. आशुतोष काळे, संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे, सोसायटीचे इन्स्पेक्टर प्रा. नारायण बारे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## मोहरी येथील बोगस डॉक्टरला अटक; वैद्यकीय साहित्य जप्त

**● पाथर्डी । वीरभूमी–**

सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाशी खेळत बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तालुक्यातील मोहरी येथील एका बोगस डॉक्टरला वैद्यकीय पथकाने छापा टाकून पकडले. याप्रकरणी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले यांनी पोलिसांत फिर्याद दाखल केली असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.



जिल्हा अहिल्यानगर परिषदेच्या आरोग्य विभागाने बोगस वैद्यकीय व्यावसायिकांविरोधात कारवाईची मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन दरंदले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान दराडे, परमेश्वर बडे, सचिन निकम तसेच दोन सरकारी पंच यांच्या पथकाने गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास मिळालेल्या माहितीच्या आधारे मोहरी येथे छापा टाकला.

या वेळी मूळव्याध भगेंदर उपचार केंद्र प्राकृतिक चिकित्सालय डॉ. गौरव कुमार असा फलक असलेल्या इमारतीत एक व्यक्ती बोगस वैद्यकीय व्यवसाय करताना आढळून आला. संबंधित व्यक्तीकडे वैद्यकीय व्यवसाय करण्याचा परवाना व वैद्यकीय पदवीबाबत चौकशी करण्यात आली असता, त्याच्याकडे कोणतीही वैद्यकीय पदवी अथवा परवाना नसल्याचे निष्पन्न झाले.

छाप्यामध्ये सुमारे दोन हजार रुपये किमतीचे वैद्यकीय साहित्य, रुग्णांवर उपचार करण्यासाठी लागणारी औषधे व अन्य साहित्य जप्त करण्यात आले. त्यानंतर डॉ. सचिन दरंदले यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

याप्रकरणी गौरव गोवचंद्र विश्वास (वय ४५), रा. मोहरी, ता. पाथर्डी (मूळ रा. बहिरगांसिंग, ता. प्रतापगड, जि. लोंगिया, राज्य पश्चिम बंगाल) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, तालुक्यात अनेक गावांमध्ये परप्रांतीय तसेच खोट्या पदव्यांच्या आधारे काही जण बोगस वैद्यकीय व्यवसाय करत असल्याची चर्चा आहे. माणिकदौंडी, खरवंडी, मिरी, तिसगाव आदी भागांमध्येही अशा व्यावसायिकांवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामीण भागातील नागरिकांकडून होत आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातंर्गत
# हिंगोली पंचायत समितीच्या पथकाकडून कळस ग्रामपंचायतची तपासणी

**● अकोले । वीरभूमी–**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत सहभागी ग्रामपंचायतच्या तपासणी हिंगोली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी माया वानखडे यांच्या अध्यक्षतेखालील पथकाकडून अकोले तालुक्यातील कळस ग्रामपंचायत ची तपासणी करण्यात आली. या पथकात हिंगोली पंचायत समितीचे विस्तार अधिकारी डी. डी. घुगे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे हिंगोली जिल्हाध्यक्ष तथा दैनिक गांवकरीचे जिल्हा प्रतिनिधी गजानन मगर, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी मग्रा रोहयो निलेश राठोर यांचा सहभाग आहे.

यावेळी अकोले पंचायत समीतीचे प्रभारी गटविकास अधिकारी रमेश मुठे, विस्तार अधिकारी विजय धाकतोडे, नंदराम पवार आदी उपस्थित होते.

कळस ग्रामपंचायतचे कार्यालय, कळस जिल्हा प्राथमिक शाळा, अंगणवाडी, पशुवैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, तलाठी कार्यालय, स्मशानभूमी आदी ठिकाणी भेटी दिल्या. कळसेश्वर देवस्थान चा परिसर पाहून भारावून गेले. प.पु. सुभाषपूरी महाराज यांनी या देवस्थान चा विकास कुठलीही शासकीय मदत न घेता लोकवर्गणीतून केलेला पाहून आश्चर्य व्यक्त केले. जिल्हा परिषद शाळेतील कॉम्पुटर व विज्ञान लॅब पाहूनही समाधान व्यक्त केले. शाळे चे पटसंख्या बाबद आनंद व्यक्त केला. गावातील ग्रामस्थ पदाधिकारी यांचा एकोपा व सलोखा या बाबद त्यांना आश्चर्य वाटले. गावातील व मंदिर परिसरात असलेली स्वच्छता याचेही कौतुक केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान (२०२५–२६) हे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाचे एक महत्त्वाकांक्षी पाऊल आहे, ज्याचा उद्देश ग्रामपंचायती सक्षम करून शाश्वत ग्रामीण विकास साधणे आहे. हे अभियान सुशासन, पाणी व्यवस्थापन, जनसहभाग आणि डिजिटल साक्षरतेवर भर देत असून प्रत्येक गाव समृद्ध झाले तर, राज्यही समृद्ध होईल या उद्देशाने राज्य शासनाने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला असून हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर याकालावधी पर्यंत राबविल्या गेले आहे. या अभियानात सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा अशा विविध घटकांवर त्या त्या ग्रामपंचायतीला गुण मिळणार आहेत.



यावेळी सरपंच राजेंद्र गवांदे, माजी सरपंच तथा सोसायटीचे चेअरमन विनय वाकचौरे, माजी सरपंच तथा जयकीसान दूध संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब वाकचौरे, पोलीस पाटील देवस्थान चे सचिव गोपीनाथ ढगे, ग्रामपंचायत सदस्य जिजाबा वाकचौरे, दत्तात्रय वाकचौरे, माजी उपसरपंच दिलीप ढगे, माजी ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब वाकचौरे आदी उपस्थित होते,

यावेळी ग्रामसेवक ज्ञानेश्वर सुर्वे, कामगार तलाठी सुरेखा कानवडे, वैद्यकीय अधिकारी रिद्धी जाधव, मुख्याध्यापक तान्हाजी वाजे, पशुधन अधिकारी रविंद्र घोडके, आशा गतप्रवर्तक भारती गायकवाड आरोग्य सेविका पुष्पा मेंगाळ, आरोग्य सेवक अजित कदम अंगणवाडी सेविका मालती गोसावी, आशा ढगे, मनीषा वाकचौरे, संगीता वैराट, आशा सेविका सुनीता गवांदे, तनुजा हासे, योगिता चव्हाण, ग्रामपंचायत कर्मचारी संजय सोनवणे, माधव वाकचौरे, शंकर वाघमारे आदींनी आपली माहिती सादर केली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## न्यू इंग्लिश स्कूल काकडी विद्यालयाचा एसएससीचा ९६.१५ टक्के निकाल

**● कोपरगाव । वीरभूमी–**

कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल काकडी विद्यालयाने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९६.१५ टक्के लागला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा रोवला आहे.विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये साई गणपत गुंजाळ याने ८४ % गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. कु. सायली अशोक विघ्ने हिने ७९.६० % गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला, तर कार्तिक संदीप गुंजाळ याने ७९.२० % गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन व माजी आमदार अशोकराव काळे, आमदार आशुतोष काळे, व्हाईस चेअरमन छबुराव आव्हाड आणि सौ. चैतालीताई काळे, सोसायटीचे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व इन्स्पेक्टर प्रा. नारायण बारे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## प्रगत विद्यालयाचा निकाल ८९.०४ टक्के

**● कोपरगाव । वीरभूमी–**

येथील प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत बोर्ड परीक्षा (इयत्ता १० वी) फेब्रुवारी/मार्च २०२६ चा निकाल ८९.०४ टक्के लागला आहे. या परीक्षेत विद्यालयातून कु. निधी अविनाश इप्पलपेल्ली हिने ८३.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. ममता नवराम चौधरी हिने ८०.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. वैष्णवी पांडुरंग चोथे हिने ७४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाचे नाव उज्ज्वल केले.

# भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता राखून तातडीने मोबदला वितरण करा

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील | सुरत - चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक**



**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखून कामकाज करण्यात यावे. जमीन संपादन करताना संबंधित जमिनीबरोबरच त्या ठिकाणी असलेली झाडे, विहिरी, पाईपलाईन तसेच इतर मालमत्तांचे मूल्यांकन अचूक व निश्चित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावे. मूल्यांकन प्रक्रियेत कोणतीही तफावत राहणार नाही व शासनाच्या निश्चित कार्यपद्धतीत कोणताही बदल होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग निवाड्यांसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते.

बैठकीस जिल्हाधिकारी पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, माणिक आहेर, अरुण उंडे, किरण सावंत–पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी अतुल चोरमारे, सायली सोळंके, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक मिलिंदकुमार वाबळे, व्यवस्थापक सत्यम राय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, महामार्गासाठी आवश्यक असलेल्या उर्वरित जमिनीचे भूसंपादन तातडीने पूर्ण करण्यात यावे. संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढावीत. जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून प्राप्त झालेला मोबदल्याचा निधी कोणताही विलंब न लावता त्वरित वितरित करण्यात यावा. मोबदला वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखून पात्र लाभार्थ्यांना वेळेत रक्कम मिळेल याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग हा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून या प्रकल्पामुळे वाहतूक, उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे प्रकल्पाशी संबंधित सर्व कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक आहे. प्रकल्पग्रस्त शेतकरी व नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी पाचही तालुक्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तालुकानिहाय माहिती घेत प्रलंबित विषय तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती देताना सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याच्या अहिल्यानगर, संगमनेर, राहुरी, राहाता व जामखेड या ५ तालुक्यातील ६५ गावांमधून हा महामार्ग जात असून जिल्ह्यातील याची लांबी १३९.५१ किलोमीटर एवढी आहे. या महामार्गासाठी १०४४ हेक्टर आर क्षेत्रापैकी ४११.९०८ हेक्टर आर क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित प्रक्रियेबाबत प्रशासनामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत व समन्वय करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# ॲलेक्स कपमध्ये गुलमोहर व फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीची विजयी आगेकूच

**गुलमोहरचा ५-० दणदणीत विजय | पेनल्टी टायब्रेकरमध्ये फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीची बाजी**



**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील भुईकोट किल्ला मैदानावर सुरू असलेल्या ॲलेक्स कपच्या ८ व्या पर्वातील फुटबॉल स्पर्धेत गुरुवारी (दि. ७ मे) रंगलेल्या दोन चुरशीच्या सामन्यांमध्ये गुलमोहर स्पोर्टस क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी यांनी शानदार विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली. उत्कृष्ट खेळ, वेगवान पासिंग आणि गोलसमोर अचूक फिनिशिंग यामुळे गुरुवारचे सामने प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरले.

दिवसातील पहिला सामना गुलमोहर फुटबॉल क्लब आणि अहमदनगर डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशन यांच्यात झाला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच गुलमोहरच्या खेळाडूंनी आक्रमक खेळ करत प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व निर्माण केले. जलद हालचाली, अचूक पासिंग आणि समन्वयपूर्ण खेळाच्या जोरावर गुलमोहरने तब्बल ५–० गोलने शानदार विजय संपादन केला.

सामन्याच्या १६ व्या मिनिटाला प्रणव पंडित याने पहिला गोल करत संघाचे खाते उघडले. त्यानंतर आदित्य गुगळे याने २२ व्या आणि ३८ व्या मिनिटाला सलग दोन गोल करत संघाला मजबूत आघाडी मिळवून दिली. ३३ व्या मिनिटाला पार्थ मस्कर याने आणखी एक गोल करत प्रतिस्पर्ध्यांवरील दबाव वाढवला. सामन्याच्या ४७ व्या मिनिटाला अहमदनगर डिस्ट्रिक्ट संघाकडून झालेल्या? ऑन गोल? मुळे गुलमोहरच्या खात्यात पाचवा गोल जमा झाला. संपूर्ण सामन्यात अहमदनगर डिस्ट्रिक्ट संघाला एकही गोल करता आला नाही.

दिवसातील दुसरा सामना सुमन फुटबॉल क्लब आणि फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी यांच्यात रंगला. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून सावध आणि बचावात्मक खेळ करत एकमेकांना जोरदार टक्कर दिली. आक्रमण आणि प्रतिआक्रमणांच्या मालिकेनंतरही नियोजित वेळेत कोणत्याही संघाला गोल करता आला नाही. त्यामुळे सामना ०–० गोलने अनिर्णित राहिला.

यानंतर सामन्याचा निकाल पेनल्टी टायब्रेकरवर लागला. अत्यंत तणावपूर्ण वातावरणात फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीने ४–३ गोलने विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. सुमन फुटबॉल क्लबकडून अविनाश शिंदे, अक्षय गायकवाड आणि तनिष्क गायकवाड यांनी प्रत्येकी एक गोल केला. तर फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीकडून ट्र्स्क डमपुई, जोसी ललसाईमसंग, जोसेफ पुया आणि ॲक्लिमेंट चँगसन यांनी अचूक गोल करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

### या संघात रंगणार उपांत्य फेरीचे सामने

■ भुईकोट किल्ला मैदानावर शुक्रवारी संध्याकाळी उपांत्य फेरीचे सामने रंगणार असून फुटबॉलप्रेमींसाठी मोठा थरार पाहायला मिळणार आहे. फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लब विरुध्द गुलमोहर स्पोर्टस क्लब, फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी विरुध्द फिरोदिया शिवाजीयन्स युनायटेड. उपांत्य फेरीत कोणते संघ अंतिम फेरीत प्रवेश करतात याकडे आता क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# विदर्भ बीज संवर्धक कार्यक्रमात वसुंधरा अकॅडेमीचा विद्यार्थी रुशांक योगेश नवले याचा सहभाग



**● अकोले । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ आणि महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प तसेच बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे विदर्भ बीज संवर्धक कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यशाळेमध्ये विदर्भातील सुमारे ६० बीज संवर्धकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमात अकोले तालुक्यातील बीज संवर्धक तसेच भारत सरकारच्या 'सीड जिनोम सेवियर' पुरस्काराने सन्मानित श्रीमती. ममताबाई भांगरे आणि बायफचे जैवविविधता विभागाचे सह जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. योगेश नवले यांनीही मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत वसुंधरा अकॅडमी, अकोले येथील इयत्ता सहावीतील विद्यार्थी रुशांक योगेश नवले यांनी देखील सहभाग नोंदवला. लहान वयातच जैवविविधतेबाबतची जाण आणि अभ्यासू वृत्ती दाखवत रुशांकने चर्चेमध्ये सक्रिय सहभाग घेतला. आपल्या गावातील आणि परिसरातील जैवविविधतेविषयी त्याने आत्मविश्वासाने मते मांडली.

कार्यशाळेदरम्यान पीक वाण विविधता, रानभाज्या, तसेच स्थानिक पशुधन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये रुशांकने उत्साहाने सहभाग घेत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

लहान वयातच जैवविविधतेबाबत जागरूकता निर्माण करून सक्रिय सहभाग घेणारा रुशांक नवले हा भविष्यातील पर्यावरण संवर्धनाचा आशादायक प्रतिनिधी ठरत असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. त्याच्या या यशस्वी सहभागाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव प्राचार्य अल्फोन्सा डी., उपप्राचार्य राधिका नवले, संचालक मंडळ सर्व विभागांचे प्राचार्य व सर्व शिक्षक वृंद यांनी कौतुक केले.

# संजीवनी पॉलीटेक्निकच्या ५३ विद्यार्थ्यांना अद्विक हाय-टेक कंपनीत नोकरी

**टी अँड पी विभागाच्या प्रयत्नांमुळे विध्यार्थ्यांना मिळाली सुवर्णसंधी**

**● कोपरगाव । वीरभूमी–**

संजीवनी के. बी. पी. पॉलीटेक्निकच्या एकाचवेळी त्रेपन्न विद्यार्थ्यांची अद्विक हाय–टेक कंपनीत नोकरीसाठी निवड झाली. वयाच्या अवघ्या एकोणावीसाव्या वर्षी हे सर्व विद्यार्थी कमावते झाले. त्यामुळे पालक सुखावले आणि विध्यार्थ्यांच्या करिअरला देखील चांगल्या पध्दतीने सुरवात झाली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभाग विद्यार्थ्यांवर मेहनत घेतो. त्याचवेळी औद्योगिक जगतासोबत संपर्क ठेवतो, त्याचे हे फलीत आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही चांगल्या कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी हे समिकरण सार्थ ठरते आहे. या सर्व विध्यार्थ्यांना या कंपनीने आकर्षक पॅकेज दिले आहे.

या कंपनीने निवड केलेल्या विद्यार्थ्यांत मेकॅट्रॉनिक्स विभागाच्या २३ विद्यार्थ्यांमध्ये कृष्णा अष्टेकर, संकेत भरड, श्रध्दा डेंगळे, लकी फाटके, रोहीत गटकल, अंकिता जमधडे, सर्वज्ञ जोशी, कुणाल कोळपे, महेश भालेराव, तनिष्का म्हैस, मुकेश शर्मा, दिशा नेहे, साक्षी पठारे, प्राची कोल्हे, प्रणव इखे, प्रणव तुपे, शुभदा शेलार, अथर्व सोनवणे, तेजश्री जेजुरकर, गौरव तिवारी, विशेष पानगव्हाणे, शशांक वावरे व संस्कार दळवी यांचा समावेश आहे. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या ३० विद्यार्थ्यांची निवड झाली. यात वैभव शिंदे, श्रध्दा अहिरे, अभिषेक कुमार, माधव कताडे, कार्तिक लांडे, शाम बेलदार, उत्कर्षा देवकर, अंकिता खंडागळे, भाग्येश लोडे, मणिश वैद्य, अविनाश रानोडे, सार्थक लोंढे, शुभम शिंदे, तनवी दवंगे, प्रज्ञा फोपसे, मानसी म्हैस, युवराज पिंपरकर, खुशी शेजवळ, अनुराज सोळस, आदित्य ठुबे, सौरभ सिनगर, तनवी गिते, प्रतिक वाकचैरे, अबनिश कुमार, अनुराधा साळुंके, साक्षी पोपळघट, प्रतिक्षा म्हस्के, उमेश गायकवाड, बाळासाहेब इथापे व मोहम्मद समिर अलि यांचा समावेश आहे.



संस्थेचे अध्यक्ष नितिन कोल्हे आणि कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य ए. आर. मिरीकर आदि उपस्थित होते.

> मी ग्रामीण भागातील मर्यादित उत्पन्न असलेल्या कुटूंबातील विद्यार्थी. संजीवनीत करिअर घडेल असा आई वडीलांना विश्वास होता. तो आज प्रत्यक्षात साकार झाला. माझ्या आयुष्यातील हा अविस्मरणीय क्षण आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने आम्हा सर्व विद्यार्थ्यांवर घेतलेली मेहनत कामी आली. मला मेकॅट्रॉनिक्स शाखेत प्रवेश मिळाला आणि तेथूनच करिअरचा मार्ग सुकर झाला. संजीवनीमुळे हे शक्य झाले.
>
> **– विशेष पानगव्हाणे,**
> विद्यार्थी

# गावपातळीवरील वाद मिटवून विकासकामांना गती द्या

## आ. मोनिका राजळे । टाकळीमानुर येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर

**● पाथर्डी । वीरभूमी –**
गावकी व भावकीचे वाद गावपातळीवरच मिटवावेत. स्थानिक वाद विकासकामांच्या आड येत असतील तर संपूर्ण गावाला त्याचा त्रास सहन करावा लागतो. पाणंद रस्ते व शेती वहिवाट रस्त्यांबाबतचे मतभेद दूर करून शासनाच्या निधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

तालुक्यातील टाकळीमानुर येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिरात त्या बोलत होत्या. यावेळी तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, भाजप तालुकाध्यक्ष धनंजय बडे, युवा आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष शुभम गाडे, नायब तहसीलदार किशोर सानप, रवींद्र शेकटकर आदी प्रमुख व्यासपीठावर उपस्थित होते. विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे, ट्रॅक्टर तसेच आरोग्य पेटीचे वितरण करण्यात आले.

आमदार राजळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नियोजनानुसार पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात मंडलनिहाय शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. तालुक्यात यापूर्वी विविध विभागांच्या माध्यमातून झालेल्या शिबिरांत साडेसहा हजारांहून अधिक लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.

एका व्यासपीठावर विविध विभागांची कागदपत्रे उपलब्ध होत असल्याने ग्रामस्थांचा वेळ, पैसा व श्रम वाचत असल्याचे त्यांनी सांगितले. गावपातळीवरील कर्मचाऱ्यांनी विविध योजनांची माहिती व अंमलबजावणीची प्रक्रिया लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवावी, असेही त्या म्हणाल्या.

वादग्रस्त रस्त्यांच्या प्रश्नांवर तडजोड करून विकासकामांतील अडथळे दूर करावेत. यासाठी गावकऱ्यांनी समन्वयकाची भूमिका पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले.

सध्या इंधनटंचाई व विजेच्या भारनियमनाचा त्रास वाढत असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना सर्वांसाठी लाभदायक ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. तालुक्यात दहा ते बारा ठिकाणी सोलर प्लांट सुरू झाले असून त्यामुळे वीज उत्पादनाला हातभार लागत आहे. सौरऊर्जेची चळवळ लोकचळवळ व्हावी, यासाठी स्वयंसेवी संस्था व शासकीय कर्मचाऱ्यांनी लोकांमध्ये जनजागृती करावी, असेही त्यांनी सांगितले.

घरकुल योजनांबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, तालुक्यात दहा हजार घरकुल मंजूर असूनही ५० टक्के कामे पूर्ण झालेली नाहीत. यात लाभार्थ्यांचा दोष नसून यंत्रणांनी अधिक गांभीर्याने काम करणे




आवश्यक आहे. वेळेत योजना पूर्ण झाल्यास लाभार्थ्यांना योग्य वेळी फायदा मिळेल आणि पुढील विकासकामांसाठी शासनाकडून निधी नियोजन करणे सुलभ होईल.

जनगणना मोहिमेबाबत नागरिकांनी प्रगणकांना सहकार्य करून वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. येत्या पंधरा तारखेपर्यंत नागरिकांना स्वतःची माहिती ऑनलाइन पद्धतीने सादर करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी केले. सूत्रसंचालन शामसुंदर गुंजकर यांनी तर आभार नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी जयश्री महामुनी, स्वाती आव्हाड, अपेक्षा गडदे, अनिल धोत्रे, रवींद्र गाडेकर आदींनी परिश्रम घेतले.

## मढेवडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलचा दहावीचा ९९.१२ टक्के निकाल; विशाल गोडसे प्रथम

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल मढेवडगाव (ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) विद्यालयाने एस.एस.सी. बोर्ड परीक्षा फेब्रुवारी– मार्च २०२६ मध्ये ९९.१२ टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील ११४ विद्यार्थ्यांपैकी ११३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, गुणवंत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.


विद्यालयातील विशाल तुकाराम गोडसे याने ९४.८० टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. उवेज अमजद तांबोळी याने ९३.६० टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला, तर कृष्णा संजय मांडे याने ९३ टक्के मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. तसेच मयूर भाऊसाहेब जगताप याने ९२.२० टक्के मिळवत विशेष प्राविण्य प्राप्त केले. या परीक्षेत विद्यालयातील २५ विद्यार्थ्यांनी डिस्टिंक्शन, ३५ विद्यार्थ्यांनी ग्रेड–१, ३८ विद्यार्थ्यांनी ग्रेड–२ तर १५ विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण श्रेणी मिळवली.

विद्यार्थ्यांच्या यशासाठी दहावीच्या वर्गशिक्षिका मनिषा कदम, महादेवी माने तसेच प्रणव नलगे या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय मराठी विषयासाठी रामदास पवार, हिंदीसाठी सुजाता डाके, इंग्लिशसाठी मीनाक्षी कदम, गणितासाठी प्रणव नलगे व महादेवी माने, विज्ञानासाठी वैभव काळुखे, विशाखा साळवे, लक्ष्मी बोलणे तसेच समाजशास्त्रासाठी राजेंद्र शेळके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यालयाचे पर्यवेक्षक विलास सुलाखे व मुख्याध्यापक हौसराव दांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश संपादन झाले. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक स्कूल कमिटी, शालेय व्यवस्थापन समिती, माता–पालक संघ, सरपंच, चेअरमन, ग्रामस्थ व हितचिंतकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले.

## जिद्दीला सलाम! उजव्या हाताची बोटे गमावली, डाव्या हाताने पेपर लिहून जयदीपने दहावीत मिळविले ८५ टक्के गुण

**● पारनेर । वीरभूमी–**
माणसाची जिद्द आणि चिकाटी असेल, तर संकटांचे डोंगरही पार करता येतात, याचा प्रत्यय पारनेरमधील जिजामाता विद्यालयाचा विद्यार्थी जयदीप सुरेखा जगन्नाथ औटी याने दिला आहे. मागील वर्षी एका भीषण अपघातात उजव्या हाताची बोटे गमावल्यानंतरही जयदीपने हार मानली नाही. त्याने डाव्या हाताने लिहिण्याचा सराव केला आणि नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात ८५ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले.जयदीप हा मागील वर्षी नववीत शिकत असताना त्याच्यावर काळाने घाला घातला. कडबा कुट्टी करण्याच्या यंत्रात त्याचा उजवा हात अडकल्याने त्याला आपली बोटे गमवावी लागली. या अपघातानंतर तो तब्बल तीन महिने रुग्णालयात उपचार घेत होता. उजवा हात निकामी झाल्याने भविष्यातील शिक्षणाचे काय? असा प्रश्न समोर उभा होता. मात्र, जयदीपने खचून न जाता परिस्थितीशी दोन



हात करण्याचा निर्णय घेतला.

दहावीचे महत्त्वाचे वर्ष समोर असताना त्याने डाव्या हाताने लिहिण्याचा सराव सुरू केला. सुरुवातीला येणाऱ्या अडचणींवर मात करत त्याने अक्षर सुधारले आणि वेगाने लिहिण्याचा सराव केला. जिजामाता विद्यालयातील शिक्षकांनी आणि कुटुंबीयांनी त्याला सतत प्रोत्साहन दिले, ज्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढत गेला.जयदीपच्या या यशाचे वृत्त समजताच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे, आनंद मेडिकल फाउंडेशनचे प्रमुख डॉ. सादिक राजे, फहाद राजे आणि प्राचार्य संतोष ठाणगे यांनी त्याचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले. त्याच्या या संघर्षाला त्याचे वडील, आई सुरेखा औटी आणि मामा प्रा. तुषार ठुबे यांचे भक्कम पाठबळ लाभले.

## विठे विद्यालयात वैष्णवी आरोटे प्रथम, साहिल भागवत द्वितीय तर मयुर उघडे तृतीय



**● अकोले । वीरभूमी–**
अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील ह.भ.प. सावित्रीआई माध्यमिक विद्यालय, विठे येथील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील कु. वैष्णवी हरीदास आरोटे हिने ८१.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर साहिल मदन भागवत याने ७८ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. मयुर लक्ष्मण उघडे याने ७३.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

याशिवाय सोहम योगेश आरोटे याने ७२.४० टक्के गुण मिळवत चौथा क्रमांक मिळविला असून अदिती किसन आरोटे हिने ७०.६० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तसेच अकोले कन्या विद्यालयातील सेमी इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी कु. छत्रपती विश्वासराव आरोटे याने ७४.६० टक्के गुण प्राप्त केले. अगस्ती विद्यालयातील विद्यार्थी कु. आर्यन नवनाथ आरोटे याने ४५ टक्के गुण मिळवत यश संपादन केले.

इयत्ता दहावी व बारावीमध्ये यश मिळविणाऱ्या गावातील सर्व गुणवंत, ज्ञानवंत व बुद्धिवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालक, शिक्षक व विद्यालयाचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, शेतकरी व व्यावसायिक संध्या हरीदास आरोटे यांच्या कुटुंबाचेही सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# नावीन्यपूर्ण विकासकामांतून अहिल्यानगरला राज्यातील अग्रगण्य शहर बनविणार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील । चितळे रोड येथे नेहरू मार्केट भूमिपूजन समारंभ उत्साहात

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**
बदलत्या काळानुसार शहरांची रचना आणि सुविधा विकसित करणे ही काळाची गरज असून नावीन्यपूर्ण विकासकामांच्या माध्यमातून अहिल्यानगरला राज्यातील अग्रगण्य शहराची ओळख मिळवून द्यावी. सामान्य नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देत सार्वजनिक सुविधा, आधुनिक बाजारपेठा आणि सार्वजनिक उद्यानांसारख्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शहरातील चितळे रोड येथे नेहरू मार्केटचे भूमिपूजन पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, नेहरू मार्केटची स्थापना १९६७ साली झाली असून या बाजारपेठेने शहराच्या व्यापारी विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज या मार्केटला नव्या स्वरूपात ऊर्जितावस्था प्राप्त होत आहे. शहर झपाट्याने बदलत असताना जुन्या शहराच्या पाऊलखुणा जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विकास करताना शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा विसरून चालणार नाही, असेही ते म्हणाले.

लोकांच्या गरजा वाढत असून बदलत्या परिस्थितीनुसार शहराची उभारणी करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे रोजगार क्षेत्रातही मोठे बदल होत आहेत. त्यामुळे भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शहरातील सुविधा आणि पायाभूत विकासाची दिशा निश्चित करावी लागणार आहे. आधुनिक बाजारपेठा, सार्वजनिक सुविधा आणि नागरिकांसाठी दर्जेदार नागरी सुविधा निर्माण करण्यावर शासनाचा भर आहे. शहरात अधिकाधिक सार्वजनिक उद्याने उभारण्यास प्राधान्य देण्यात यावे, यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध प्रकल्प राबविण्यात येत असून शहर अधिक सुशोभित आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचेही पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, शेतकऱ्यांसाठीही आधुनिक सुविधांनी सुसज्ज स्वतंत्र



मार्केट उभारण्याची आवश्यकता आहे. कृषी उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी अशा प्रकारचे नावीन्यपूर्ण प्रकल्प राबविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

नावीन्यपूर्ण प्रयोग आणि नियोजनबद्ध विकासातून शहराचे स्वरूप बदलता येणार असून अहिल्यानगरला राज्यातील आदर्श आणि अग्रगण्य शहर म्हणून विकसित करण्यासाठी विकासकामांना गती देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सुमारे ९ कोटी ३४ लक्ष रुपयांच्या निधीतून तळमजल्यासह तीन मजली मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये ५७ गाळे व ५३ ओटे बांधण्यात येणार आहेत. व्यापाऱ्यांना या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सुविधाही देण्यात येणार आहेत.

कार्यक्रमास पदाधिकारी, व्यापारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.